



रयत शिक्षण संस्थेचे,

# श्री सद्‌गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्टस अ‍ॅण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगांव

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, महाराष्ट्र – ४२३६०१

ISO 9001 - 2008

**इतिहास विभाग, राज्यशास्त्र विभाग**

व

**सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने**

विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत

# "स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील शेतकरी व कामगार चळवळ"



**दोन दिवसीय**

**राज्यस्तरीय चर्चासत्र**

**दिनांक १६ जानेवारी २०१५ ते १७ जानेवारी २०१५**

पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून,
ती श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे !




संपादक...

**प्राचार्य डॉ. के. पी. काकडे**

रयत शिक्षण संस्थेचे,
श्री सद्‌गुरू गंगागीर महाराज सायन्स,
गौतम आर्टस अ‍ॅण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज,
कोपरगांव, ता. कोपरगांव, जि. अ. नगर
(महाराष्ट्र) ४२३६०१.



VOL.No. III - 2015
ISBN : 978-81-923914-0-3

# संपादकीय मंडळ


| | | |
|---|---|---|
| संपादक | : | **प्राचार्य, डॉ. के. पी. काकडे**<br>एस.एस.जी.एम.कॉलेज,कोपरगांव<br>ता.कोपरगांव, जि.अहमदनगर ४२३६०१ (महाराष्ट्र) |
| सहसंपादक | : | **प्रा. जी. एस. विधाटे (संयोजक)**<br>इतिहास विभाग, एस.एस.जी.एम.कॉलेज, कोपरगांव<br>ता.कोपरगांव, जि.अहमदनगर<br>**प्रा. आर. एस. झरेकर (समन्वयक)**<br>इतिहास विभाग, एस.एस.जी.एम.कॉलेज, कोपरगांव<br>ता.कोपरगांव, जि.अहमदनगर<br>**प्रा. देवीदास रणधीर**<br>भूगोल विभाग,एस.एस.जी.एम.कॉलेज, कोपरगांव<br>ता.कोपरगांव, जि.अहमदनगर |



| | | |
|---|---|---|
| चर्चासत्राचा विषय | : | स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील शेतकरी व कामगार चळवळ |
| ISBN NO. | : | VOL.No. 3-2015 978-81-923914-0-3 |
| प्रकाशक | : | प्राचार्य, डॉ.के.पी.काकडे<br>एस.एस.जी.एम.कॉलेज, कोपरगांव<br>ता.कोपरगांव, जि.अहमदनगर ४२३६०१ (महाराष्ट्र) |
| प्रकाशन स्थळ | : | कोपरगांव |
| पृष्ठे | : | २५४ |
| मुद्रक | : | श्रीराम प्रिंटींग प्रेस, कोपरगांव<br>मो. ७५८८६९३९५५ |
| आयोजक | : | इतिहास व राज्यशास्त्र विभाग<br>एस.एस.जी.एम.कॉलेज,कोपरगांव<br>ता.कोपरगांव, जि.अहमदनगर व<br>सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा |
| भाषा | : | मराठी आणि इंग्रजी |
| अर्थसहाय्य | : | विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली |
| अधिक माहितीसाठी संपर्क | : | प्राचार्य,<br>एस.एस.जी.एम.कॉलेज, कोपरगांव<br>ता.कोपरगांव, जि.अहमदनगर ४२३६०१ (महाराष्ट्र) |

VOL.No. 3 - 2015 ISBN : 978-81-923914-0-3

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद—कर्मवीर

# राज्यस्तरीय चर्चासत्र

# 'स्वातंत्र्योतर महाराष्ट्रातील शेतकरी व कामगार चळवळ'

## दिनांक : १६ जानेवारी २०१५ ते १७ जानेवारी २०१५

अर्थसहाय्य

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

आयोजनकर्ते

इतिहास विभाग, राज्यशास्त्र विभाग

श्री सदगुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्टस अॅण्ड

संजीवनी कॉमर्स कॉलेज कोपरगांव,

ता. कोपरगांव जि. अहमदनगर. महाराष्ट्र — ४२३६०१

सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार **ISO-9001-2008** नॅक पुनर्मुल्यांकन 'बी'

ई—मेल — **ssgmcoll.kop@gmail.com**

व

सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा

| संयोजक | समन्वयक | प्राचार्य, डॉ.के.पी.काकडे |
| --- | --- | --- |
| प्रा.जी.एस.विधाटे | प्रा.आर.एस.झरेकर | एस.एस.जी.एम.कॉलेज, |
| इतिहास विभाग | विभाग प्रमुख, इतिहास | कोपरगांव |

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | संशोधन पेपरचे नांव | प्राध्यापकांचे नांव | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| ३७ | गोदावरी पाटपाणी प्रश्न व कोपरगांवातील वंचित शेतकऱ्यांचे लढे | प्रा. गणेश शंकर विधाटे | १५९ |
| ३८ | शेतकरी – कष्टकऱ्यांचे नेतृत्व : क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. अमित अरूण कदम | १६७ |
| ३९ | The Farmers' Organization in Maharashtra. | डॉ. नागरे बी. आर. | १७३ |
| ४० | भारतातील कामगार चळवळ : दोष आणि उपाय | प्रा.डॉ.बी.एम. वाघमोडे | १७६ |
| ४१ | दलित अल्पभूधारक शेतकरी व शेतमजुरांच्या सदयकालीन चळवळीची दिशा व दशा | प्रा. उत्तमराव भाऊराव सूर्यवंशी | १८२ |
| ४२ | जागतिकीकरण आणि उद्योगधंद्याचे व कामगारांचे प्रश्न | डॉ. भानुदास धोंडीबा शिंदे | १८५ |
| ४३ | अडते व्यापारी व शेतकरी चळवळ | डॉ. किरण सदाशिव चव्हाण | १८८ |
| ४४ | शेतकरी कामगार पक्षाची वाटचाल | प्रा. ए. बी. राऊत | १९१ |
| ४५ | Female Work Participation Diffrential in Ahmednagar District of Maharashtra. | प्रा. एस. एन. पवार | १९४ |
| ४६ | क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी यांचे शेतकरी चळवळी | प्रा. डॉ. अजितकुमार दादासो. जाधव | २०० |
| ४७ | दत्ता देशमुख आणि अहमदनगर जिल्हयातील कामगार चळवळ | प्रा. डॉ. टी. बी. राजदेव | २०४ |
| ४८ | सहकार चळवळीला इतिहास व सहकाराची विचार प्रणाली | प्रा. डॉ. कृष्णा मालकर | २१२ |
| ४९ | महाराष्ट्रातील कामगार चळवळीची वाटचाल | प्रा. डॉ. हेमलता राठोडे | २१६ |
| ५० | क्रांतीसिंह नाना पाटील यांचे महाराष्ट्र किसान सभेतील कार्य | प्रा. सुमित यादव | २२१ |
| ५१ | स्वातंत्र भारतातील कामगार वर्गाचा विकास आणि व्यवसाय संघटना चळवळ – एक दृष्टिक्षेप | प्रा. एस. ए. होन | २२७ |
| ५२ | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि शेतकरी चळवळ | प्रा. विश्वनाथ पवार | २३० |
| ५३ | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा वाटचालीचा आढावा | प्रा. थोरात आर. एन. | २३४ |
| ५४ | नोव्हेंबर २०१२ मधील शेतकरी संघटनेचे ऊस दरवाढ आंदोलन : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. किरण गणपत कुंभार,<br>प्रा. जयपाल चंद्रकांत सावंत | २३९ |

उद्योगात एकच संघ ठेवणे.
क कामावर भर देणे या दृष्टीने चळवळीची वाटचाल व्हावी.
ारांना माणूस म्हणुन जगण्यासठी आत्मसन्मान मिळवुन द्यावा.
ा प्रस्थआपित करावी.

चात्य देशात कामगार वर्ग हा सगळ्यात सुघंठित दबाव गट आहे. कामगार भांडवलदार वर्गास ारण मालक वर्गाचे हितसंबंध आणि कामगार वर्गाचे हितसंबंध परस्पर विरोधी असतात. डाव्या ा नेत्यांनी कामगारांना मुंबई शहरात संघटित केले म्हणजेच कामगार वर्गाचे नेतृत्व पारंभी पासुन व केले. हे नेतृत्व कामगार वर्गा बाहेरचे होते तसेच या मध्यम वर्गीय नेत्यांवर साम्यवादी . त्यामुळे महाराष्ट्रातील कामगार चळवळ डाव्या विचारसरणीची असल्याचे दिसुन येते.
स्वतंत्र राजकीय पक्ष नाही बहुसंख्य कामगार संघटना राजकीय पक्षांच्या कामगार आघाड्या ुस्थिती आहे. त्यामुळे कामगार संघटनांचा राजकीय कारणास्तव वापर केला जातो. इतर दबाव नादेखील काही राजकीय पक्षांचे भाडोत्री पायदळ आहेत. राजकीय पक्ष त्यांचे आश्रयदाते तर श्रित आहेत. अशा घनिष्ठ संबंधामुळे भारतातील कामगार चळवळीची प्रगती थंडावली आहे.

गार संघटना, अशोक जैन
ी. आर. एन. पाटील
जेक आणि राजकीय चळवळी, प्रा. भिवसनकर के. एस.





# क्रांतिसिंह नाना पाटील यांचे महाराष्ट्र किसान सभेतील कार्य

**प्रा. डॉ. सुमित संभाजी यादव**
वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड,
जि. सातारा.
मोबाईल नं. ९९२२७५१७९२

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत दैदिप्यमान कामगिरी करणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटील यांचा स्वातंत्र्योत्तर काळातील सन १९४७ ते १९५३ हा सुमारे पाच वर्षांचा काळ त्यांच्या जीवनात राजकीय गोंधळाचा होता. या काळात कॉंग्रेस, शेतकरी कामगार पक्ष, कामगार किसान पक्ष, कम्युनिस्ट पक्ष असा त्यांचा राजकीय प्रवास झालेला होता. तरीही सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे हित या आपल्या अंतिम ध्येयापासून ते कधीही विचलित झाले नाहीत. नाना पाटील हे शेतकरी, कष्टकऱ्यांचे कैवारी म्हणून ओळखले जातात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी गोरगरीबांच्या हितासाठी अनेक लढे उभारले. एक लढवय्ये नेते अशीच त्यांची प्रतिमा आजच्या पिढीपुढे उभी आहे. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांनी महाराष्ट्र किसन सभेच्या माध्यमातून केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

**नाना पाटील कम्युनिस्ट पक्षात :**

गोरगरीब शेतकरी यांच्यावरील शतकानुशतकांची राजकीय, सामाजिक व आर्थिक गुलामगिरी नष्ट करून त्यांचे जीवन सुखी करण्यासाठी धडपडणारे नाना पाटील श्रमिकांच्या उद्धारासाठी कम्युनिस्ट पक्षाचा मार्ग हाच एकमेव उपाय आहे या निष्कर्षाप्रत येवून पोहोचले. त्यामुळे १९५३ साली नाशिक जिल्ह्यातील रानवट येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या परिषदेत नाना पाटलांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. माळकरी क्रांतिसिंह कॉम्रेड झाले.[1]

भारतीय कम्युनिस्ट पार्टीची स्वातंत्र्य चळवळीतील चुकीची भूमिका यामुळे कम्युनिस्टांविषयी जनतेत अप्रियता होती. नाना कम्युनिस्ट पार्टीत गेल्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेत घट होईल असे अंदाज त्यावेळी वर्तविले गेले होते. परंतु शेतकरी, कामगार आदी श्रमिक वर्ग नानांचा त्याग, कष्ट आणि गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठीची तळमळ जाणून होता. म्हणून नानांच्या कम्युनिस्ट पक्ष प्रवेशामुळे महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेची त्यांच्या प्रतीची निष्ठा व प्रेम कमी झाले नाही. त्यामुळे नंतर त्यांचे विरोधक म्हणून लागले की, सगळे ठीक आहे, पण नाना पाटील पक्ष फार बदलतात. नानांनी तिकडे लक्ष न देता आपले सुरू ठेवले.

इसवी सन १९५२–५३ च्या दरम्यान विदर्भ, मराठवाड्यात दुष्काळ पडला होता. जनता कासावीस झाली होती. सरकारतर्फे श्री. एम. आर. यार्दी या अधिकाऱ्याची फॅमिन कमिशनर म्हणून नेमणूक केलेली होती. सदर दुष्काळी परिषदेवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी दुसरी समिती नेमली होती. सरकारी पातळीवरील हे प्रयत्न खूपच अपूरे होते. म्हणून प्रत्यक्ष दुष्काळग्रस्तांना

तातडीने मदत पोहोचविण्यासाठी धनंजय गाडगीळ यांनी एक सर्वपक्षीय समिती नेमली होती. नाना पाटलांचा या समितीत समावेश होता. नानांनी जनतेला तातडीची मदत मिळावी म्हणून महाराष्ट्रभर झंझावाती दौरे काढून धान्य व पैशाच्या रूपाने मदत मिळवून देण्यात पुढाकार घेतला होता. तसेच शासकीय अधिकाऱ्यांकडून मदत वाटताना गैरप्रकार होवू नयेत यासाठीही लक्ष दिले. तसेच दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सरकारने या भागात पाझर तलाव काढावे, शेतीची नालाबंदिस्ती करावी, या भागात धरणांचे पाणी पोहचवून बागायती शेती फुलवावी, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन काटेकोरपणे करावे असे उपायही सुचविले.[१] शासकीय यंत्रणा व सर्वपक्षीय दुष्काळ निवारण समिती यांच्यामुळे या दुष्काळात जनतेला आधार मिळाला. नाना पाटील जरी कम्युनिस्ट पक्षात आले असले, तरी त्यांची गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठीची असलेली तळमळ कायम असल्याचे यातून दिसून येते.

शेतीप्रधान देशाची प्रगती होण्यासाठी इथल्या शेतकरी वर्गाची उन्नती झाली पाहिजे, असे नानांचे प्रांजळ मत होते. भांडवलधार्जिण्या सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे सर्वसामान्य जनतेवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी जनतेच्या संघटना बांधून आंदोलने उभी करणे हेच नाना पाटलांच्या समाजकारणाचे व राजकारणाचे मूलभूत सूत्र होते. शेतकरी व शेतमजूर याविषयी त्यांना विशेष आस्था होती. सामान्य शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर करण्यासाठी संस्थानिक, जहागिरदार, जमीनदार, पाटील, देशमुख यांच्याकडील अतिरिक्त जमिनी काढून घेवून या जमिनींचे सामाजिकरण किंवा फेरवाटप झाले पाहिजे. हा क्रांतिकारी विचार महाराष्ट्रातील ग्रामीण शेतकरी व शेतमजूरांना क्रांतिसिंहांनीच प्रथम सांगितला. क्रांतिसिंहांची शेतकऱ्याविषयीची ही तळमळ पाहून कम्युनिस्ट पक्षाने त्यांना 'महाराष्ट्र किसान सभेचे' अध्यक्ष म्हणून नियुक्त केले.[२]

**फलटण येथील खंडकरी शेतकऱ्यांचा लढा :**

क्रांतिसिंह नाना पाटलांच्या अध्यक्षतेखाली कम्युनिस्ट पक्षाने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शेतकरी व शेतमजूरांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधी प्रस्थपित जमिनदारांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेवून महाराष्ट्रभर लढे उभारले होते. फलटण तालुक्यतील साखरवाडी येथील खंडकरी शेतकऱ्यांचा लढा हा त्याचाच एक भाग होता. सध्याचा फलटण तालुका व आसपासचा काही भाग हा पूर्वी फलटण संस्थानच्या अधिपत्याखाली होता. नीरा नदीवरील भोर येथील धरणातून काढलेल्या उजव्या कालव्यामुळे पाडेगांव, कुसूर, साखरवाडी, फलटण इ. भाग बारमाही ओलिताखाली आलेला होता. येथील साखरवाडी येथे फलटण संस्थानच्या संमतीने श्री. आपटे व मफतलाल यांनी खाजगी साखर करखाना काढलेला होता. या कारखान्याला नियमित व किफायतशीरपणे ऊस पुरवठा व्हावा यासाठी कुसूर, साखरवाडी, नेवासेवस्ती, सागरवाडी आदी १७ गावातील बागायती जमिनी खंडाने करार करून कारखान्यासाठी घेतल्या होत्या. त्याचा खंड हा नाममात्र एक रूपया व कराराची मुदत २५ ते ३० वर्षे अशी होती. कारखाना व्यवस्थापन या जमिनीवर ऊसाचे उत्पादन घेवून प्रचंड नफा कमवित होते. तर जमिनीचा मूळ मालक हा खंडाच्या जमिनीत अल्प मजूरीवर मजूर म्हणून राबत होता. १९५२ पर्यंत जवळजवळ सर्व खंडाच्या जमिनींचे करार संपुष्टात आले होते. त्यामुळे कारखान्याने या खंडाच्या जमिनी मूळ मालकांना परत देणे किंवा खंड वाढवून देणे





क्रमप्राप्त होते. परंतु कारखान्याच्या भांडवलदार व्यवस्थापनाने तसे करण्यास नकार देवून त्या जमिनी तशाच आपल्या ताब्यात ठेवल्या होत्या. या अन्यायी व दडपशाहीच्याविरूद्ध तेथील शेतकऱ्यांनी आवाज उठवून आंदोलन सुरू केले.[३] या आंदोलनाचा अहवाल महाराष्ट्र किसन सभेचे अध्यक्ष म्हणून नाना पाटलांकडे आल्यानंतर त्यांनी या आंदोलनात जातीने लक्ष घालून आंदोलन करण्याचे ठरविले. या कामी कॉ. हरिभाऊ निंबाळकर, कॉ. दादा ननावरे, कॉ. बाजीराव जगताप, कॉ. माधवराव गायकवाड, कॉ.काकाजी कदम, कॉ. नारायणराव माने, कॉ. शेख काका इत्यादींनी सहकार्य केले. तसेच सुलोचनादेवी निंबाळकर, बनुबाई भिलवडे, काशीबाई पाटील, विठाबाई पोवार आदींनी महिलांच्या आघाडीचे नेतृत्व केले. आंदोलनात निदर्शने करून सत्याग्रह केले गेले. तसेच १९४२ च्या लढ्याच्या धर्तीवर कारखान्याच्या ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाड्या अडविणे, शेतातील ऊस नांगरटीत मुजवणे अशा कारवाया जनतेतून केल्या जावू लागल्या. आंदोलनाची तीव्रता खूपच वाढू लागली. तेव्हा मुंबई प्रांताच्या भांडवलधार्जिण्या सरकारने शेतकऱ्यांची न्याय मागणी दुर्लक्षित करून हे आंदोलन मोडून काढण्यासाठी कॉ. बाजीराव पैलवान यांना ८ महिनेची हद्दपारीची शिक्षा दिली. बऱ्याच शेतकऱ्यांना पकडून तुरुंगात टाकले तर नाना पाटलांसहित इतर कम्युनिस्ट नेत्यांवर फलटणच्या भागात जाण्यास बंदी घातली.[४] या बंदीहुकूमाची पर्वा न करता नानांनी तेथे जावून आंदोलकांना मार्गदर्शन केले. तेव्हा सरकारने क्रांतिसिंहांना पकडून फलटणच्या तुरूंगात ठेवले. तरीही बाहेरील जनतेने लढा प्रखरतेने चालूच ठेवला होता. नानांच्या वतीने खटला ॲड. श्री. व्ही. एन. पाटील यांनी चालवून सरकारचा बंदीहुकूम बेकायदेशीर ठरविला.सलग दोन वर्षे हा लढा लढविला गेला. क्रांतिसिंहांनी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे काढून जनतेला खंडकरी शेतकऱ्यांची न्यायाची बाजू पटवून दिली. मुंबई राज्य विधानभवनातही अनेक प्रतिनिधींनी या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले. त्यामुळे शेवटी सरकारने नमते घेवून याबाबतीत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी एक समिती नेमली. पुढे चर्चेअंती १९६२–६३ साली कारखान्याने शेतकऱ्यांना एक एकर जमीन परत दिली व उरलेल्या जमिनीचा खंड वाढवून ६ रूपये करून, ती जमीन कारखान्याच्या कामगारांच्या नावे करून त्याचे शेती महामंडळ स्थापन करण्यात यावे असा निर्णय घेतला.[५]

या आंदोलनाने शेतकऱ्यांना फक्त एक एकर जमीन परत व उरेल्या जमिनीच्या खंडाची रक्कम वाढवून मिळाली. शेतकऱ्यांची संपूर्ण मागणी मान्य झाली नसली तरी स्वातंत्र्योत्तर काळातील आपल्या न्याय मागणीसाठी लोकशाहीच्या मार्गाने दिलेल्या या सर्वसामान्य जनतेच्या लढ्याचा हा फार मोठा विजय होता. अन्यायाविरूद्ध संघटीत होवून लढा दिल्यास सरकारला नमते घ्यावे लागते, हे महाराष्ट्रीयन जनतेला क्रांतिसिंह नाना पाटलांनीच प्रथम दाखवून दिले. यामुळे महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांचा स्वाभिमान जागा झाला व तेही आपल्यावरील अन्यायाविरूद्ध दाद मागण्यास प्रवृत्त झाले. आजही खंडकरी शेतकरी क्रांतिसिंहानी दाखविलेल्या मार्गावरून संपूर्ण न्याय मिळावा म्हणून हा लढा चालवत आहेत.

**शेतमालाला हमीभाव मिळावा यासाठी संघर्ष :**

व्यापारी आणि भांडवलदार वर्ग हा शेतकऱ्यांची पिळवणूक शेतमालाचे भाव पाडून करत असतो. शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळत नाही. त्यामुळे त्याची आर्थिक

दुरावस्था वाढतच जाते. म्हणून शेतमालाच्या किंमती उत्पादन खर्चावर आधारीत ठेवून या उत्पादन खर्चामध्ये शेतकऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या श्रमाच्या मोबदल्याचाही अंतर्भाव असला पाहिजे. तसेच यावर सरकारचेही नियंत्रण असावे अशी रास्त व आग्रही मागणी नानांनी केली होती. अशा प्रकारे शेतीच्या अर्थशास्त्राचा सखोल अभ्यास करून शेतकऱ्यांच्या हितासाठी भूमिका घेणारे नाना पाटील हे महाराष्ट्रातील पहिलेच मराठी नेते होते.

आपल्या न्याय मागण्यांसाठी शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी नानांनी संपूर्ण महाराष्ट्रभर प्रचार दौरे काढले होते. संपूर्ण जगात वस्तूचा उत्पादकच वस्तूचे भाव ठरवत असतो. परंतु आपल्या देशात शेतमालाचे भाव मात्र उत्पादक नव्हे तर घेणारा ठरवत असतो. ही विसंगती दूर झाली पाहिजे. यासाठी समाजाचे प्रबोधन करताना नाना पाटील एक मार्मिक उदारहण देत. ते पुढीलप्रमाणे – "बंधूंनो आपला ऊस उत्पादक शेतकरी आपल्या ऊसाचे गुऱ्हाळ करून तयार होणारा गूळ घेवून पुण्या–मुंबईच्या बाजारात स्वतःच्या खर्चाने घेवून जातो. रात्रभर प्रवास करून पहाटे गूळ सट्टेबाजारातील व्यापाऱ्याच्या दारासमोर नेवून उतरवतो. अन् तो व्यापारी बाहेर येण्याची वाट बघत बसतो. तेवढ्यात त्या व्यापाऱ्याचे लहान मूल बाहेर येते व गुळाच्या ढेपा पाहून वडिलांना विचारते की, 'पापा, पापा ये इतन बडा कौनसा फल है? और ये कौनसे पेड को लगता है?' एवढे गुळाबद्दलचे अज्ञान असणाऱ्या पोराच्या बापाने देशातील गुळाचा भाव ठरवायचा, आहे की नाही गंमत. हे असे किती दिवस चालणार आहे. कारण जर तुम्ही एखाद्या कपड्याच्या दुकानात गेला व त्या कपड्याचा भाव तुम्ही ठरवू लागला तर तर तो दुकानदार तुमचे ऐकेल काय? तर बदला आता हे सारं. तुमचा हक्क मिळविण्यासाठी संघटीत व्हा आणि लढा द्या."[९]

अशा प्रकारे नाना पाटील शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत असा योग्य भाव मिळावा यासाठी जनतेला मार्गदर्शन करत होते. त्यांनी एका बाजूला अर्थशास्त्राचे वस्तूच्या किंमतीविषयीचे किचकट सिद्धांत न समजणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या हक्काविषयी जागृत करून संघटीत केले. तर दुसऱ्या बाजूला गूळ, हळद, शेंग, मिरची, कांदा, तूर, ज्वारी, तांदूळ इत्यादी प्रमुख शेतमालाच्या किमान किंमतीची हमी सरकारने दिली पाहिजे आणि हमी दिलेल्या किंमतीला शेतकऱ्याने उत्पादन केलेला सर्वच्या सर्व माल वेळप्रसंगी सरकारने खरेदी केला पाहिजे. तरच भारतीय शेतकऱ्याला शेतीमध्ये स्वास्थ राहील व शेती किफायतशीर होवून खऱ्या अर्थाने देश प्रगतीपथाकडे वाटचाल करेल. अशी मागणी निवेदनाद्वारे सरकारच्या निदर्शनास आणून देत होते.

**धरणग्रस्तांचा लढा :**

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस सरकारने पिण्याचे पाणी, शेती, वीज या मूलभूत गरजा भागविण्यासाठी देशातील नद्यांवर धरणे बांधण्याचा निर्णय घेतला होता. देशाच्या प्रगतीच्या दिशेने टाकलेले हे एक क्रांतिकारी पाऊल होते. याअंतर्गत मुंबई प्रांतातील सातारा जिल्ह्यातील कोयना या नदीवर एक विशाल धरण बांधण्याचे निश्चित केले गेले होते. या धरणामुळे जसे फायदे होते, तसेच दुसऱ्या बाजूला बाधित क्षेत्रातील स्थानिक लोकांचे पुनर्वसन करण्याचाही प्रश्न महत्त्वाचा होता. या धरणासाठी सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील ९८ गावे व त्यातील ९,०६९ एवढ्या खातेदारांची जमीन बाधित होत होती.[८] सरकारने त्या सर्व लोकांचे योग्य पुनर्वसन करण्याचे वचन दिले





होते. परंतु १९ जानेवारी, १९५८ रोजी या धरणाचे प्रत्यक्षात काम सुरू झाले तरीही बाधित लोकांचे प्रश्न सुटलेले नव्हते. सरकारने लोकांना पुनर्वसन करण्याचा दिलेला शब्द न पाळल्यामुळे अनेक कुटुंबे देशोधडीला लागली होती. त्यामुळे जवळजवळ ३०,००० एवढ्या लोकसंख्येच्या विस्थापित समूहासाठी नाना पाटलांनी आंदोलन सुरू केले. यामध्ये त्यांना अॅड. व्ही. एन. पाटील, कॉ. शेख काका यांनी सहकार्य केले. या विस्थापित गावातील लोकांना सरकारने घरे, जमीन, रस्ते, वीज आदी जीवनावश्यक गोष्टी अग्रक्रमाने पुरवाव्यात, त्यांच्या शेतीला बारमाही पाण्याची व्यवस्था करावी, त्यांना नोकरीत प्राधान्य द्यावे, तसेच पुन्हा धरणे बांधताना अगोदर बाधित लोकांचे योग्य पुनर्वसन करावे व मगच काम चालू करावे. अशा प्रकारच्या मागण्या सरकारकडे नानांनी केल्या. त्याचबरोबर महाराष्ट्रभर फिरून ज्या लोकांच्या त्यागावर उद्याच्या प्रगतीशील समाजाची उभारणी करण्यात येणार आहे. त्या लोकांशी सहानुभूती दाखवून त्यांचे योग्य पुनर्वसन व्हावे यासाठी समाजात जागृती करण्याचे कामही नाना पाटलांनी केले.[९]

विस्थापितांच्या प्रश्नावर प्रखर आंदोलने करूनही सरकारने याकडे दुर्लक्ष केले. तसेच पुढील काळात नवीन धरणे बांधतानाही विस्थापितांच्या प्रश्नाकडे सहानुभूतीने पाहिले नाही. तरीही धरणग्रस्तांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी प्रखरतेने लढा दिला पहिजे ही शिकवण नानांनी त्यांना दिली. नानांच्या विचाराने पन्नास वर्षानंतरही डॉ. भारत पाटणकरांसारख्या निस्पृह समाजसेवकाच्या नेतृत्वाखाली आजही ही मंडळी आपल्या हक्कासाठी भांडत आहेत. त्यांना अजूनही न्याय मिळालेला नाही. हे एक प्रकारे सरकारच्या चुकीच्या भांडवलधार्जिण्या धोरणाचेच प्रतीक आहे. नाना पाटील यांनीच महाराष्ट्रात धरणग्रस्तांवर होणाऱ्या अन्यायाला प्रथम वाचा फोडण्याचे काम केले. तसेच महाराष्ट्र किसान सभेच्या व्यासपीठावरून त्यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडून त्यांच्यात जागृती निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या या कार्याची दखल घेवून कम्युनिस्ट पक्षाने डिसेंबर, १९५४ मध्ये त्यांची अखिल भारतीय किसान सभेचे उपाध्यक्ष म्हणून निवड केली. तर सहा महिन्यानंतर लगेचच मे, १९५५ मध्ये त्यांची अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली गेली.[१०]

**समारोप :**

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने महाराष्ट्रातील डाव्या विचारसरणीच्या सर्वच पक्षांचा दारूण पराभव केल्यामुळे कष्टकरी चळवळीला ओहोटी लागलेली होती. महाराष्ट्रातील काँग्रेसविरोधी गटातील बहुजन समाजाचे अनेक नेते हे काँग्रेसमध्ये परत जात होते. त्यांना तेथे मानाची पदे मिळत होती. परंतु नानांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता श्रमिकांचे राज्य आणण्यासाठी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. कम्युनिस्ट पक्षानेही त्यांच्या गोरगरीबांप्रतीच्या कल्याणासाठीची तळमळ जाणून त्यांची महाराष्ट्र किसान सभेच्या अध्यक्षपदी निवड केली. या सभेच्या माध्यमातून त्यांनी फलटणच्या खंडकरी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी दिलेला लढा व धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरले. त्यांच्या या कार्यामुळे लगेचच त्यांची अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष म्हणूनही निवड झाली. अशा प्रकारे नानांच्या कार्याला राष्ट्रीय व्यासपीठ मिळून देण्यात या महाराष्ट्र किसान सभेच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कार्याचा बहुमोल वाटा आहे.

**संदर्भ**


(१) भागवत कमल, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील, भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २६ जानेवारी, १९७७. पृष्ठ – २२.

(२) शिवणीकर राघव, साताराचा सिंह – क्रांतिसिंह नाना पाटील समग्र चरित्र, एस्. एम्. अभाटे पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट, १९८६, पृष्ठ – २५५.

(३) कित्ता, पृष्ठ – २५७.

(४) मुलाखत – कॉ. माने किरण, कम्युनिस्ट विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते (सातारा, जि. सातारा), दि. ६/१/२०१२.

(५) मुलाखत : श्रीमती पाटील हौसाताई, क्रांतिसिंहांच्या कन्या, जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक (हणमंतवाडिये, जि. सांगली), दि. १४/११/२०११.

(६) शिवणीकर राघव, उपरोक्त, पृष्ठ – २७२, २७३.

(७) सावंत शिवाजी व शिवणीकर राघव, क्रांतिसिंहांची गावरान बोली, अनुबंध प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, मे, १९९२, पृष्ठ – ८६.

(८) रेकॉर्ड, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, सातारा, कोयना पुनर्वसन उपविभाग, क्र. २, पृष्ठ – ५.

(९) मुलाखत : अ‍ॅड्. पाटील धैयशील, अ‍ॅड्. व्ही. एन. पाटील यांचे चिरंजीव व सामाजिक कार्यकर्ते (सातारा, जि. सातारा), दि. १२/३/२०१२.

(१०) भागवत कमल, उपरोक्त, पृष्ठ – २४.






# स्वातंत्र्यपूर्व भारतातील कामगार वर्गाचा विकास आणि व्यवसाय संघटना चळवळ : एक दृष्टीक्षेप


**प्रा. वाय. एम. भिलोरे**
(अर्थशास्त्र विभाग)
एस.एस.जी.एम महाविद्यालय कोपरगाव
ymbhilore@gmail.com (Ph.9604047235)

**प्रा. एस्. ए. होन**
(अर्थशास्त्र विभाग)
एस.एस.जी.एम महाविद्यालय कोपरगाव
(Ph.9226781102)


**प्रास्तावना :**

भारतात प्राचीन काळापासून उद्योगव्यवसाय अस्तित्वात होते. युरोपियांचे भारतात आगमन भारतातील तयार माल घेण्यासाठी झाले होते. मात्र भारतात कुटीरोद्योग होतो. 18 व्या शतकाच्या शेवटी इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतिमुळे भारतातील कुटीरोद्योग जवळजवळ समाप्ता झाले आणि भारत केवळ कच्चामाल उत्पादन करणारा देश बनला. काळाच्या ओघात भारततही उद्योगव्यवसाय सुरू झाले. सामान्यतः हा काळ सन 1850 ते 1870 दरम्यानचा आहे. डलहौसीच्या कारकिर्दीत सन 1853 पासून भारतात दळणवळण व्यवस्थेत यंत्राचा वापर सुरू झाला. रेल्वे रूळ टाकण्यासाठी आणि यंत्रांना लागणारा कोळसा काढण्यासाठी हजारो मजूर काम करू लागले. भारतीय कामगार वर्गाचा हा उदयकाळ होता. रेल्वेशी संबंधित इतरही उद्योग विकसित होऊ लागले.

सन 1854 मध्ये मुंबईला कापड गिरणी आणि कलकत्याला ज्यूट गिरणी सुरू झाली. चहा व्यवसायातही शेकडो मजूर कार्यरत होते. कापड उद्योगात सन 1886 मध्ये मजूरांची संख्या 74 हजार होती ती सन 1905 मध्ये 195000 झाली. तसेच ज्यूट उद्योगात सन 1879 –80 मध्ये असलेली 27494 मजूरांची संख्या सन 1905 मध्ये 154962झाली. कोळसा खाणीमध्ये सन 1904 मध्ये काम करणाऱ्या मजूरांची संख्या 75749 होती. इंग्लंड आणि इतर देशातील मजूरांना प्रारंभीच्या काळात ज्या समस्यांना तोंड दयावे लागले त्या समस्या भारतातील मजूरांसमोरही होत्या. कमी मजूरी, जास्त वेळ काम, कारखान्यांमधील अस्वच्छ वातावरण, बालमजूर, कोणत्याही सवलती नसणे अशा प्रकारचे त्या समस्यांचे स्वरूप होते. ह्याव्यतिरिक्त भारतीय कामगारांना परकिय गुलामगिरीचे चटके बसत होते. परकिय राजवटीमुळे भारतीय कामगार चळवळीत एक वैशिष्ट्य दिसून येते. वसाहतवादामुळे निर्माण झालेल्या विशिष्ट राजकिय परिस्थितीला तोंड देत असतांनाच भारतीय कामगारांना परकिय भांडवलदारांच्या व भारतीय भांडवलदारांच्या शोषणाला तोंड दयावे लागत होते. त्यामुळे कामगार संघटनांची चळवळ स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग बनली. अशापकारे भारतीय कामगार आपल्या आर्थिक फायद्यासाठी व देशस्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील होते.

**अध्ययनाचा उद्देश :**

1. व्यवसायिक कामगार संघटनांचा इतिहास जाणून घेणे.
2. पहिल्या व दुसऱ्या महायुध्दाच्या काळात व्यवसाय संघटना चळवळीच्या उदयांची कारणे जाणून घेणे.

**औद्योगिक कामगार वर्गाचा उदय :**

आधुनिक अर्थाने भारतातील औद्योगिक कामगार वर्ग हा लोकसंख्येच्या मानाने मोठा नाही, तथापि त्याला काही केंद्रात निर्णायक शक्ती आहे. आणि तो गट संलग्न, प्रागतिक, निश्चयी आणि तत्वतः जनतेतील एक क्रातीकारक भाग समजला